# NOTIFICATION

Food, Civil Supply and Consumer
Protection Department,
Madam Cama Marg,
Hutatma Rajguru Chowk,
Mantralaya, Mumbai - 400 032.
Dated: - 27th March, 2023.

National Food Security Act, 2013.

No. ASuKa-2021/CR-77/CS-22.-The following draft of rules which the Government of Maharashtra proposes to make in exercise of the powers conferred by sub-sections *(1)* and *(2)* of section 40 of the National Food Security Act, 2013 (20 of 2013) and of all other powers enabling it in this behalf, is hereby published as required by sub-section *(1)* of section 40 for information of all persons likely to be affected thereby; and notice is hereby given that the said draft rules will be taken into consideration by the Government of Maharashtra on or after the 3rd day of April, 2023.

Any objections or suggestions which may be received by the Secretary, Food, Civil Supply and Consumer Protection Department, Mantralaya Annexe, Madam Cama Marg, Hutatma Rajguru Chowk, Mumbai 400 032, from any person with respect to the said draft on or before the aforesaid date, will be considered by the

Government.

1. These rules may be called the Maharashtra Food Security (Amendment) Rules, 2023.

2. In rule 4 of the Maharashtra Food Security Rules, 2019 (hereinafter referred to as "the principal rules") to clause *(ii)*, the following clauses shall be added, namely:-

"*(4)(iii)(a)* For the purpose of section 14 of the Act, following of the officers of Food, Civil Supplies and Consumer Protection Department shall function as a Nodal Officer for Internal Grievance Redressal Mechanism in their respective jurisdiction.

| Sr. No. | Name of the Nodal Officer | Region/Area |
|---|---|---|
| 1. | Inspecting Officer | Tehsil |
| 2. | Assistant District Supply Officer | District |
| 3. | Rationing Officer | Area covered under respective rationing offices in Mumbai-Thane Rationing Area |
| 4. | Assistant Controller of Rationing | Respective regions in Mumbai-Thane Rationing Area |
| 5. | Assistant Food Distribution Officer | Respective regions in Pune, Solapur and Nagpur Urban Area |
| 6. | Zonal Officer | Pune, Solapur and Nagpur Urban Area |

*(b)* Nodal Officers shall resolve the complaints received by them. The complaints beyond his jurisdiction shall be forwarded to the concerned authority.

3. After rule 4 of the principal rule, following rules shall be inserted, namely:-

"4 A. *District Grievance Redressal Officer* –

Officer not below the rank of the Additional Collector shall be designated by the State Government to be the District Grievance Redressal Officer for their respective district.

Provided that, officer directly engaged in the delivery of entitlements under the Act shall not be designated as District Grievance Redressal Officer."

4. Before rule 7 of the principal rules, the following rule shall be added, namely:-

" 6A *(1)* The State Government shall appoint, by notification, a Commission to be known as the "State Food Commission", as per provisions of section 16 of the Act.

*(2)* For appointment of Chairperson and members of the State Food Commission, the application shall be invited through a public notice in newspapers/ website of the Food, Civil Supplies and Consumer protection Department.

*(3)* A screening committee shall shortlist the available

candidates for appointment of Chairperson and members of the State Food Commission. The said screening committee shall consist as following:-

*(a)* Secretary, Food, Civil Supplies and Consumer Protection Department - Chairman;

*(b)* Controller, Rationing and Director, Civil Supplies, under the Food, Civil Supplies and Consumer Protection Department – Member;

*(c)* Deputy or Joint Secretary, Food, Civil Supplies and Consumer Protection Department - Member

(4) The list of candidate shortlisted by the committee shall be submitted to the State Government for consideration of appointment of the Chairperson and members.".

5. After rule 7 of the principal rules, the following rule shall be inserted, namely:-

"7 A. *Staff of the State Food Commission.*

*(1)* The State Government shall make available to the State Food Commission, such administrative and technical staff, as it may consider necessary for the proper functioning of the State Commission.

*(2)* The method of appointment of the staff under sub-

rule (1) above, their salaries, allowances and conditions of service shall be such, as may be specified by the State Government.".

6. After rule 10 of the principal rules, following Chapters shall be added, namely:-

## "CHAPTER V
## TRANSPARENCY AND ACCOUNTABILITY

11. All the lists regarding eligible beneficiaries and the allocation of food grains in the State shall be regularly updated by the State Government on its official website, from time to time for the inspection to the public.

12. The State Government shall at regular intervals conduct Social Audit of the Targeted Public Distribution System and other welfare schemes as specified in the section 28 of the Act. The method of conduction of Social Audit shall be such, as decided by the Government, from time to time.

13. *(1)* For ensuring transparency and proper functioning of Targeted Public Distribution System and accountability of the functionaries, the State Government shall set up State Vigilance Committees as specified in the

section 29 of the Act.

*(2)* The various level Vigilance Committees, shall be at the State level, District level, Taluka level, Village level, Municipal Council level and Municipal Corporation level.

*(3)* The composition of the vigilance Committees shall be such as may be decided by the State Government from time to time.

## CHAPTER VI
## MISCELLANEOUS

14. The State Government may, at any time, if so desires utilize the service of the institutional mechanism established under the Act for any other schemes or programmes of the Central Government or the State Governments as mentioned under section 43 of the Act.".

By order and in the name of the
Governor of Maharashtra,

(VIJAY WAGHMARE)
Secretary to the Government of Maharashtra

# अधिसूचना

| | |
|---|---|
| | अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभाग,<br>मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरू चौक,<br>मंत्रालय,<br>मुंबई-४०००३२<br>दिनांक २७ मार्च,२०२३ |

राष्ट्रीय अन्न सुरक्षा अधिनियम, २०१३.

**क्रमांक असुका-२०२१/प्र.क्र.७७/नापु-२२.-** राष्ट्रीय अन्नसुरक्षाअधिनियम,२०१३(२०१३चा २०) याच्या कलम ४० च्या पोट-कलम (१) व (२) द्वारे प्रदान केलेल्या अधिकारांचा, आणि याबाबतीत समर्थ करणाऱ्या इतर सर्व अधिकारांचा वापर करून उक्त अधिनियमाच्या कलम ४० च्या पोट-कलम (१) द्वारे आवश्यक असल्याप्रमाणे महाराष्ट्र शासनाने प्रस्तावित केलेल्या नियमांचे पुढील प्रारूप, यामुळे बाधा पोहोचण्याचा संभव असलेल्या सर्व व्यक्तींच्या माहिती करिता, याद्वारे प्रसिद्ध करण्यात येत आहे; आणि अशी सूचना करण्यात येत आहे की, उक्त प्रारूप, महाराष्ट्र शासनाकडून दिनांक ३ एप्रिल, २०२३ रोजी किंवा त्यानंतर विचारात घेण्यात येईल.

उपरोक्त दिनांकास किंवा त्यापूर्वी, उक्त प्रारूपाबाबतीत, कोणत्याही व्यक्तीकडून ज्या कोणत्याही हरकती किंवा सूचना सचिव, अन्न नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभाग, मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरू चौक, मंत्रालय विस्तार भवन, मुंबई-४०००३२ यांच्याकडे प्राप्त होतील त्या शासन विचारात घेईल.

**१.** या नियमांना, महाराष्ट्र अन्नसुरक्षा (सुधारणा) नियम, २०२३ असे म्हणावे.

**२.** महाराष्ट्र अन्नसुरक्षा नियम, २०१९ (यात यापुढे ज्याचा निर्देश, "मुख्य नियम"असा केला आहे) च्या नियम ४ च्या पोटनियम (दोन) नंतर, पुढील नियम दाखल करण्यात येईल:-

"(४) (तीन)(क) अधिनियमाच्या कलम १४ च्या प्रयोजनार्थ, अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभागातील पुढील अधिकारी हे, त्यांच्या संबंधित अधिकारितेत अंतर्गत तक्रार निवारण यंत्रणेसाठी नोडल अधिकारी म्हणून कार्य करतील.

| अनुक्रमांक | नोडल अधिकाऱ्याचे पदनाम | विभाग/क्षेत्र |
|---|---|---|
| १. | निरिक्षण अधिकारी | तहसील |
| २. | सहायक जिल्हा पुरवठा अधिकारी | जिल्हा |
| ३. | शिधावाटप अधिकारी | मुंबई-ठाणे शिधावाटप क्षेत्रातील |

| | | |
|---|---|---|
| | | संबंधित शिधावाटप अधिकाऱ्याच्या अखत्यारीत अंतर्भूत असलेले क्षेत्र. |
| ४. | सहायक शिधावाटप नियंत्रक | मुंबई ठाणे शिधावाटप क्षेत्रातील संबंधित प्रादेशिक विभाग |
| ५. | सहायक अन्न वितरण अधिकारी | पुणे, सोलापूर व नागपूर नागरी क्षेत्रातील संबंधित प्रादेशिक विभाग |
| ६. | परिमंडळ अधिकारी | पुणे ,सोलापूर व नागपूर शहरी क्षेत्र |

(ख) नोडल अधिकारी, त्यांना प्राप्त झालेल्या तक्रारीचे निराकरण करेल. तसेच, त्यांच्या अधिकारक्षेत्रा बाहेरील तक्रारी संबंधित प्राधिकाऱ्याकडे पाठविल.

३. मुख्य नियमाच्या नियम ४ नंतर पुढील नियम समाविष्ट करण्यात येईल:-

"क. *जिल्हा तक्रार निवारण अधिकारी-*

अपर जिल्हाधिकाऱ्याच्या दर्जापेक्षा कमी दर्जा

नसलेल्या अधिकाऱ्यास राज्य शासनाकडून जिल्हा तक्रार निवारण अधिकारी म्हणून पदनिर्देशित करण्यात येईल:

परंतु, या अधिनियमांतर्गत लाभ वितरणाशी थेट सहभागी असणाऱ्या अधिकाऱ्यास जिल्हा तक्रार निवारण अधिकारी म्हणून पदनिर्देशित करण्यात येणार नाही."

४. मुख्य नियमांच्या नियम ७ पूर्वी, पुढील नियम दाखल करण्यात येईल:-

"६क *(१)* राज्य शासन, अधिसूचनेद्वारे, अधिनियमाच्या कलम १६ मधील तरतुदीनुसार " राज्य अन्न आयोग" म्हणून ओळखण्यात येणारा एक आयोग स्थापित करील.

*(२)* राज्य अन्न आयोगाच्या अध्यक्षाच्या व सदस्यांच्या नियुक्ती करिता वृत्तपत्रातील /अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभागाच्या संकेतस्थळावरील सूचनेद्वारे अर्ज मागविण्यात येतील.

*(३)* छाननी समिती, राज्य अन्न आयोगाच्या अध्यक्षाच्या व सदस्यांच्या नियुक्तीसाठी उपलब्ध असलेल्या उमेदवारांची संक्षिप्त यादी तयार करील. उक्त छाननी समितीमध्ये पुढील सदस्यांचा समावेश असेल:-

*(क)* सचिव, अन्न ,नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभाग -अध्यक्ष

*(ख)* अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभागाच्या अखत्यारितील नियंत्रक, शिधावाटप व संचालक, नागरी पुरवठा -सदस्य;

*(ग)* उपसचिव किंवा सहसचिव, अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभाग- सदस्य

(४) समितीने छाननी केलेल्या उमेदवारांची सूची अध्यक्ष व सदस्यांच्या नियुक्तीसाठी राज्य शासनाकडे विचारार्थ सादर करण्यात येईल.".

५. मुख्य नियमांच्या नियम ७ नंतर पुढील नियम समाविष्ट करण्यात येईल:-

"७क. राज्य अन्न आयोगाचा कर्मचारी वर्ग.

(१) राज्य शासन, राज्य अन्न आयोगाचे कार्य सुरळीत चालण्यासाठी त्यास योग्य वाटेल असा प्रशासकीय व तांत्रिक कर्मचारी वर्ग उपलब्ध करून देईल.

(२) वरील पोट-नियम (१) खालील कर्मचारी वर्गाच्या नियुक्तीची पद्धत, त्यांचे वेतन,भत्ते व सेवाशर्ती शासनाकडून विनिर्दिष्ट करण्यात येतील त्याप्रमाणे असतील."

६. मुख्य नियमातील नियम १० नंतर पुढील प्रकरणे दाखल करण्यात येतील:-

**प्रकरण पाच**

**पारदर्शकता व जबाबदारी**

**११.** राज्यातील पात्र लाभार्थ्यांच्या आणि अन्नधान्य नियतनाच्या सर्व याद्या जनतेला वेळोवेळी तपासण्यासाठी राज्य शासनाकडून त्याच्या अधिकृत संकेतस्थळावर नियमितपणे अद्ययावत करण्यात येतील.

**१२.** राज्य शासन, नियमित कालावधीने लक्ष्य निर्धारित सार्वजनिक वितरण प्रणालीचे आणि अधिनियमाच्या कलम २८ मध्ये विनिर्दिष्ट केल्याप्रमाणे इतर कल्याणकारी योजनांचे सामाजिक अंकेक्षण करील. सामाजिक अंकेक्षणाची कार्यपद्धती, शासनाने वेळोवेळी ठरविल्याप्रमाणे असेल.

**१३.** *(१)* लक्ष्य निर्धारित सार्वजनिक वितरण प्रणालीची पारदर्शकता आणि तिच्या सुरळीत कार्यासाठी व सदर कार्ययंत्रणेची जबाबदारी सुनिश्चित करण्यासाठी राज्य शासन, अधिनियमाच्या कलम २९ मध्ये विनिर्दिष्ट केल्याप्रमाणे विविध स्तरावर दक्षता समित्या स्थापन करील.

*(२)* दक्षता समित्या ह्या राज्य, जिल्हा, तालुका, गाव, नगरपरिषद व महानगरपालिका अशा विविध स्तरावर कार्यरत असतील.

*(३)* दक्षता समित्यांची रचना राज्य शासनाकडून वेळोवेळी ठरविल्याप्रमाणे असेल.

| | |
|---|---|
| | **प्रकरण सहा**<br><br>**संकीर्ण**<br>**१४.** राज्य शासनाला, कोणत्याही वेळी आवश्यक वाटल्यास, अधिनियमाच्या कलम ४३ मध्ये नमूद केल्याप्रमाणे केंद्र सरकारच्या किंवा राज्य शासनाच्या कोणत्याही इतर योजनांसाठी किंवा कार्यक्रमांसाठी अधिनियमान्वये स्थापित केलेल्या संस्थात्मक यंत्रणेची सेवा वापरता येईल.".<br><br>महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,<br><br>(विजय वाघमारे)<br>शासनाचे सचिव. |